दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शनिवार दि.२० डिसेंबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ११८ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Saturday 20 December 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 118 ● Pages 4 ● Rate 4 Rs

### साताऱ्यात सरकारच्या आशीर्वादाने ड्रग्ज व्यवसाय

**मुंबई**–अंबादास दानवे म्हणाले, साताऱ्याचे पोलिस या सर्व ड्रग्ज व्यवसायाला सपोर्ट करत होते. तिथे ड्रग्ज व्यवसाय सुरू होता. तिथपर्यंत जाण्यासाठी ७५ लाखांचा रस्ता बांधण्यात आला. तिथे लोकवस्तीही नव्हती. आपल्याकडे लोकवस्तीला अजून रस्ते नाहीत. पाणंद रस्त्याला एक रुपया मिळत नाही. पण जिथे लोकच राहत नाहीत, तिथे ७५ लाख रुपयांचा रस्ता का होतो? याचा अर्थ हा ड्रगचा व्यवसाय सरकारच्या आशीर्वादाने सुरू होता. एकनाथ शिंदे यांच्या गावाजवळचे हे गाव आहे. त्यात त्यांच्या बंधूंचे नाव आले आहे.मुख्यमंत्री कोणत्याही तपासाशिवाय स्वतःच क्लीनचिट देत आहेत. मागे त्यांनी रणजितसिंह नाईक निंबाळकरांना दिली. आता शिंदेंना दिली. मुख्यमंत्री स्वतः तपास अधिकारी झाले की काय? हा प्रश्न आहे, असे ते म्हणाले.

# माणिकराव कोकाटेंची तुरुंगवारी टळली हायकोर्टाकडून १ लाखाचा जामीन मंजूर

## पण शिक्षेला स्थगिती नाही, आमदारकीवरही टांगती तलवार!


### माणिकराव कोकाटे आयसीयूमध्ये

**माणिकराव कोकाटे यांचे वकील रवींद्र कदम यांनी कोकाटे यांचे मेडिकल रिपोर्ट कोर्टासमोर सादर केले. कोकाटे सध्या आयसीयूमध्ये डमिट असल्याची माहिती कदम यांनी दिली आहे. तसेच कोकाटे यांच्यावर अँजिओप्लास्टी करण्यात येणार असल्याची माहिती कदम यांनी दिली आहे. त्यामुळे कोकाटे यांना सोमवार किंवा मंगळवारपर्यंत दिलासा देण्यात यावा, असा युक्तिवाद रवींद्र कदम यांनी केला आहे. तसेच कोकाटेंच्या शिक्षेला स्थगिती द्या, असाही युक्तिवाद कदम यांनी केला.**

### आर्थिक परिस्थिती बदलत असते–कदम

**रवींद्र कदम यांनी माणिकराव कोकाटे यांची बाजू मांडताना म्हटले की, घर मिळाल्याची तारीख आणि घर घेतल्यानंतरची आर्थिक परिस्थिती बदलत असते. यावर झथऊने काय क्रॉस एक्झॅमिनेशन केले आहे तेही बघून घ्या, अशा सूचना कोर्टाने दिल्या आहेत. तसेच कदम यांच्याकडून कोकाटे यांची आर्थिक परिस्थिती कशी बदलली आहे याचे जुने आणि नवे संदर्भ मांडण्यात आले.**

**मुंबई (प्रतिनिधी)**–अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्याकडून त्यांचे क्रीडा खाते काढून घेण्यात आले असून आता त्यांचा राजीनामा देखील स्वीकारण्यात आला आहे. माणिकराव कोकाटे यांच्या प्रकरणावर मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. त्यात त्यांना एक लाखाच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर करण्यात आला.मात्र, ते दोषी असल्याचे कोर्टाने मान्य करत त्यांच्या शिक्षेला स्थगिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे त्यांची तुरुंगवारी तूर्तास टळली आहे. परंतु, त्यांच्या आमदारकीवरची टांगती तलवार कायम आहे.मुंबई उच्च न्यायालयात सुनावणीला सुरुवात झाली असून यावेळी दोन्ही पक्षांचा जोरदार युक्तिवाद होत असल्याचे समजते. तसेच कोकाटे यांचे वकील रवींद्र कदम यांनी कोकाटे यांना सोमवार किंवा मंगळवारपर्यंत दिलासा द्यावा, अशी मागणी केली असल्याचे समजते. तर सरकारी वकिलांनी म्हटले की कोकाटे यांना न्यायालयाकडून अटक वॉरंट जारी झाला असूनही कोकाटे सरेंडर झाले नसल्याचे म्हटले आहे. ही सुनावणी न्यायमूर्ती लड्डा यांच्यासमोर झाली.



रवींद्र कदम यांनी सत्र न्यायालयाच्या निकालावरही आक्षेप घेतला. निकालात कोकाटेंच्या वार्षिक उत्पन्नाबाबत केवळ अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. म्हणजेच न्यायालयानेही उत्पन्न नेमके किती होते, हे स्पष्टपणे नमूद केलेले नाही. अर्जाच्या वेळी उत्पन्न ३५ हजारांपेक्षा जास्त होते, हे सिद्ध करण्याची जबाबदारी सरकारी पक्षाची होती, असा युक्तिवाद त्यांनी केला. तसेच १९८९ ते १९९४ या कालावधीतील उत्पन्न ग्राह्य धरण्याचा कुठेही कायदेशीर उल्लेख नसल्याचेही त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.हस्तक्षेप याचिकाकर्त्यांच्या युक्तिवादानुसार, कोकाटे व त्यांच्या भावाने बनावट कागदपत्रे सादर केली होती. तसेच कमी उत्पन्न दाखवून कोकाटे यांनी सदनिका लाटल्या. कायद्याच्या माहिती असतानाही गरिबांच्या प्रवर्गातून त्यांनी अर्ज केला. तसेच कोकाटे सभापती होते, त्यांनी जे केले त्याची त्यांना कल्पना होती, असा युक्तिवाद हस्तक्षेप याचिकाकर्त्यांनी कोर्टात केला आहे. तसेच कोकाटे यांचे भाऊ कंत्राटदार होते त्यांची २५ एकर जमीन होती. त्यामुळे दोघेही आर्थिक दुर्बल घटकात नसल्याचा युक्तिवाद हस्तक्षेप याचिकाकर्त्यांनी केला.सुनावणीच्या वेळी माणिकराव कोकाटे यांचे आणखी एक वकील अनिकेत निकम यांनी पोलिस पाटलांची साक्ष वाचून दाखवली आहे. यावर कोर्टाने आक्षेप घेतला असून कोकाटेंच्या मालमत्तेचा अंदाज नसल्याचे पोलिस पाटलांनी म्हटले होते. तुमच्याकडे खरेच जमीन नाही का? असा सवाल कोर्टाने उपस्थित केला आहे. यावर शेती आणि वकिली हे माझ्या उत्पन्नाचे स्त्रोत होते असे कोकाटे यांनी म्हटल्याचे अनिकेत निकम यांनी युक्तिवाद केला.न्यायमूर्ती लड्डा यांनी माणिकराव कोकाटे प्रकरणी निकाल सुनावताना म्हटले की, अर्जदार माणिकराव कोकाटे हे वैधानिक पदावर आहेत, राज्याचे मंत्री आहेत. अशावेळी त्या व्यक्तीने अधिक जबाबदारीने आणि लोकशाही मूल्यांचे पालन करून काम करणे अभिप्रेत असते. या प्रकरणात जे पुरावे कनिष्ठ न्यायालयात आले आहेत, त्यावरून कोकाटे यांच्यावरील फसवणुकीचे आरोप निर्विवादपणे सिद्ध झाल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे हे प्रकरण अपवादात्मक गटात मोडत नाही, जिथे अपिल प्रलंबित असताना शिक्षा स्थगित ठेवायला हवी. पुरावे लक्षात घेता शिक्षा स्थगित करण्यास हे न्यायालय उत्सुक नाही, असे निरीक्षण न्यायमूर्तींना नोंदवले आहे.

## परळी नगर परिषद सार्वत्रिक निवडणुक ; मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज

दैनिक वादळ वार्ता
**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

परळी नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीची मतदान प्रक्रिया दि. ०२ डिसेंबर रोजी पार पडली. तर उर्वरित मतदान दि.२० डिसेंबर रोजी होणार आहे. त्याकरिता शनिवार २१ डिसेंबर रोजी निकालाची प्रक्रिया सकाळी १० वाजेपासून सुरू होणार असून निवडणूक विभागाने त्याअनुषंगाने तयारी सुरू केली आहे. दरम्यान, मतमोजणीच्या दिवशी या ठिकाणी सर्व उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांनी सकाळी ७ वाजता उपस्थित रहावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी अरविंद लाटकर यांनी केले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,परळी वैजनाथ नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या मतमोजणी प्रक्रियेला अधिक पारदर्शक आणि सुरळीत बनवण्यासाठी तयार करण्यात येत आहे. निवडणुकीसाठी मतदान झाल्यावर आता मतमोजणी प्रक्रीयेसाठी नगर परिषद निवडणूक प्रशासनाची यंत्रणा सज्ज झाली आहे. परळी वैजनाथ नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता दिनांक ०२.१२.२०२५ रोजी मतदान संपन्न झाले, उर्वरित प्रभाग क्रमांक ३ मधील अ व ब, प्रभाग क्र. ९ अ व प्रभाग क्रमांक १४ ब या जागे करिता दिनांक २०.१२.२०२५ रोजी मतदान होणार आहे. यासाठी मतमोजणी दिनांक २१.१२.२०२५ रोजी सकाळी १० वाजल्यापासून सुरू होणार आहे. या करिता ९ टेबलची व्यवस्था करण्यात आली आहे. एका टेबलासाठी ४ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याकरिता मुख्य २ फेऱ्या होणार आहेत. पहिल्या फेरीमध्ये प्रभाग क्रमांक १ ते प्रभाग क्रमांक ९ तर दुसऱ्या फेरी मध्ये प्रभाग क्रमांक १० ते प्रभाग क्रमांक १७ ची मतमोजणी होणार आहे. टपाली मतमोजणी त्याच प्रभागातील त्याच टेबलवर होणार आहे. प्रत्येक टेबलवर त्या प्रभागातील सर्व मतदान केंद्रांची मतमोजणी होणार आहे. याकरिता मतमोजणीसाठी उमेदवार किंवा मतमोजणी प्रतिनिधी कोणीही एकच




उपस्थित राहू शकणार आहेत. तर नगराध्यक्ष पदासाठी नऊ टेबलाकरिता एक प्रतिनिधी याप्रमाणे उपस्थित राहणार आहेत. मतमोजणीच्या ठिकाणी मोबाईल आणण्यास बंदी आहे. प्रत्येक उमेदवार व प्रतिनिधींची मेटल डिटेक्टर द्वारे तपासणी करूनच मतमोजणी केंद्राच्या ठिकाणी मतमोजणी करिता सोडण्यात येणार आहे. मतमोजणी केंद्रावर प्रवेश करतेवेळी आपले ओळखपत्र सोबत ठेवणे आवश्यक आहे. ओळखपत्र नसल्यास आपणास मतमोजणी कक्षात प्रवेश मिळणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी. मतमोजणी केंद्रावर शांततेचा भंग होऊ नये व कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी प्रशासनाने आवश्यक खबरदारी घेतली आहे. परळी वैजनाथ नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या मतदानाची प्रक्रिया सुरळीत पार पडली. मतदान झाल्यानंतर सर्व ईव्हीएम मशीन स्ट्रांग रूममध्ये कडेकोट बंदोबस्तात सुरक्षित ठेवण्यात आली आहेत. स्ट्रॉंग रूमच्या सुरक्षेसाठी पोलिस तैनात आहेत. स्ट्रॉंग रूम सीसीटीव्हीच्या निगराणीखाली आहेत. आता २१ डिसेंबर रोजी होणाऱ्या मतमोजणीकडे उमेदवार आणि मतदारांचे लक्ष लागून आहे. मतदान सुरळीतपणे पार पडल्यानंतर, आता मतमोजणी सुरळीतपणे पार पडण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी व नगर परिषद कडून चोख नियोजन केले आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस बंदोबस्तासाठी तैनात रहाणार आहे. अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अरविंद लाटकर यांनी दिली आहे.

## विकासाची जाण असणारे आमदार प्रकाशदादा सोळुंके यांचा मंत्रिमंडळात समावेश करा–बाळासाहेब सोनटक्के

दैनिक वादळ वार्ता
**तेलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे अनुभवी, अभ्यासु, व सर्वसामान्यांना आपल्या हक्काचा आमदार असलेले प्रकाश दादा सोळके यांचा मंत्रिमंडळात समावेश करावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब सोनटक्के यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे पक्षश्रेष्ठीकडे केली आहे.माजलगाव विधानसभा मतदारसंघातील बहादुर मतदारांनी आपल्या हक्काचा माणुस म्हणुन प्रकाश दादा सोळंके यांना
विधानसभेत पाठवले असून त्यांना मतदार संघाच्या विकासाची जाण आहे. तसेच बीड जिल्ह्यात विकासात्मक कामे करायची असतील तर दूरदृष्टीनेता व सेवा करण्याची संधी द्यावी. पक्षश्रेष्ठीने मतदारसंघ नव्हे तर बिड जिल्ह्यातील विकासाचा अनुशेष भरून काढायचा असेल तर. आ. प्रकाशदादा सोळंके हे जिल्ह्यातील जेष्ठ व अनुभवी व्यक्तिमत्व आहे. जिल्ह्यातील विविध विकासात्मक कामे करण्यात तरबेज सर्वसामान्यांच्या मदतीला सतत धावुन जाणारा नेता म्हणून प्रकाशदादा सोळंके यांना मंत्रिपद देऊन जनतेची सेवा करण्याची संधी द्यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब सोनटक्के यांनी



केले आहे . आज या भागातील शेतकरी, शेतमजुर, बेरोजगार, ऊसतोड कामगार समृद्ध झाला पाहिजे यासाठी आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी मोठ्या प्रमाणात विवीध विकासकामे केली असुन मतदारसंघात विकासाची गंगा आणलेली आहे. म्हणून त्यांच्या कार्यावर विश्वास ठेवून माजलगाव विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी त्यांना मतदानरुपी आशीर्वाद देऊन आमदार केले असून पक्षश्रेष्ठीने त्यांना मंत्रीपद देऊन त्यांच्या विकासात्मक कामाचा गौरव करावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब सोनटक्के यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

## प्रगतशील शेतकरी बाबूराव पाटील शिंदे यांच्या वतीने दर्श अमावास्या (वेळ अमावास्या) सण उत्साहात साजरा



दैनिक वादळ वाता
**नायगाव । हनुमंत चंदनकर**

नायगांव तालुक्यातील खंडगांव येथील शेतकरी बाबूराव पाटील शिंदे यांच्या वतीने आज दिनांक १९ डिसेंबर रोजी जिजाऊ संकुल खंडगाव येथे दर्श अमावास्या (वेळ अमावास्या) सण उत्साहात साजरा करण्यात आला बाबुराव पाटील शिंदे पारंपारिक संस्कृतीचे जतन करत आज शेतकऱ्यांचा सर्वात महत्त्वाचा मानला जाणारा सण वेळ अमावास्या सण उत्साहात साजरा केला शेतात कडव्याची खोपी घालून आंबील फळे हिरवी भाजी असे पारंपारिक सात्विक भोजन करून शेतीमातेची पूजा आरती केली यावेळी नांदेड जिल्ह्याचे खासदार प्रतिनिधी केशवराव पाटील चव्हाण माधव आप्पा बेळगे उद्योगपती श्रीराम सावकार मेडेवार वसंत सावकार मेडेवार सदानंद सावकार मेडेवार प्रसिद्ध उद्योजक बाबू सावकार शकरवार श्रावण पाटील भिलवंडे माधव आप्पा बेळगे लक्ष्मणराव ठक्करवाड शंकर पाटील कल्याण भास्कर पाटील भिलवंडे संभाजी पाटील भिलवंडे गजानन पाटील भिलवंडे रवींद्र पाटील भिलवंडे पाटील संजय पाटील चव्हाण नागनाथ अनंतवाड मनोहर आप्पा साधू गंगाधर सावकार शक्करवार सतीश सावकार लोकमनवार शिवाजी पाटील वडजे भागवत सावकार लोकमनवार कुमुद पटेल सुरेश पाटील खांडगावकर गणेश पाटील पवार के हरि बाबू सर सचिन पाटील ताटे परमेश्वर पाटील गडगेकर गजानन पाटील मुजळगेकर विश्वंभर पाटील कल्याण विश्वंभर पाटील शिंदे सुभाष पाटील मुजळगेकर गजानन पाटील पवार भगवान पाटील लंगडापुरे संजय पाटील बोमनाळे गंगाधर वडगावे गंगाधर पाटील भिलवंडे मारुती पाटील भिलवंडे भास्कर कोकणे महादेव कोरे नंदकुमार कोरे नंदेश्वर कोरे राजकीय सामाजिक व शिक्षण क्षेत्रातील आणि पंचक्रोशीतील शेतकरी पालक वर्ग मित्रमंडळी व पाहुणेमंडळी यांच्यासह खंडगाव गावकरी व इतर सर्वजण उपस्थित.

## येवता येथे दोन गटात तुफान मारामारी आठ जणांवर परस्पर विरोधी गुन्हे

दैनिक वादळ वाता
**केज । प्रतिनिधी**

विहिरीच्या पाण्यावरून दोन भाऊ एकमेकांना भिडले.त्यांनी कुऱ्हाड, कत्ती आणि काठीने एकमेकांना मारहाण केल्याने दोघे जण जखमी झाल्याची घटना येवता येथे घडली.याप्रकरणी दोन्ही गटाच्या आठ जणांविरुद्ध परस्पर विरोधी केज पोलिसात गुन्हे नोंद झाले आहेत.येवता येथील मल्हारी लक्ष्मण सक्राते वय ५३ वर्षे यांच्या फिर्यादीनुसार ते बुधवारी दि.१७ डिसेंबर सायंकाळीं साडेसहा वाजण्याच्या दरम्यान स्वतःच्या शेतात असताना तेथे अशोक लक्ष्मण सक्राते हा सख्खा भाऊ, प्रणव अशोक सक्राते, समाधान अशोक सक्राते, शिवकन्या अशोक सक्राते आले व या शेतातील विहिर आमची आहे,तु पाण्याची मोटार चालू करू नकोस असे म्हणून शिवीगाळ केली.आपण बारीबारीने पाणी घेऊ असे त्यांना म्हणालो असता अशोक याने कुऱ्हाडीने हल्ला करून ती डोक्यात मारून जखमी केले.व इतरांनी काठीने व चापटाबुक्याने मारहाण करीत



आमच्या विहिरीजवळ पाऊल ठेवायचा नाही.नसता जिवे मारून टाकू अशी जीवे मारण्याची दिली. मल्हारी सक्राते यांच्या फिर्यादीवरून चौघांविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.दुसऱ्या गटाचे प्रणव अशोक सक्राते यांच्या फिर्यादीनुसार बुधवारी दि. १७ डिसेंबर रोजी ते विहिरीवर मोटार चालू करण्यास गेले असता त्यांचे चुलते मल्हारी लक्ष्मण सक्राते,दिपक मल्हारी सक्राते,प्रविण मल्हारी सक्राते,शारदा मल्हारी सक्राते हे तेथे आले.व विहिरीवरील मोटार चालु करू नकोस, विहिर व पाण्याची मोटर आमची आहे.असे म्हणून शिवीगाळ करून चापटा व लाथाबुक्यानी मारहाण केली.तर मल्हारी सक्राते यांनी धारदार कत्तीने हातावर मारून जखमी केले.व इतरांनी दगडाने मारून मुकामार दिला.व विहिरीजवळ पुन्हा पाऊल ठेवल्यास तुम्हाला जिवे मारून टाकीन अशी जीवे मारण्याची धमकी दिली. प्रणव सक्राते याच्या फिर्यादी वरून चौघां विरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शना खाली जमादार हनुमान मुंडे हे पुढील तपास करीत आहेत.

संपादकीय

# आरोपीच्या पिंजऱ्यात

वेळीच सावध होणं आणि शहाणपणाने स्वतःची अडचणीतून सुटका करून घेणं हे शहाणपणाचं लक्षण मानलं जातं. राज्याच्या मंत्रिमंडळात पोहोचलेले, वर्षानुवर्षं उपमुख्यमंत्री पदावरून राज्याचा गाडा हाकणाऱ्यांना ही गोष्ट माहीत नाही, असं कसं म्हणता येईल? उलट, सर्वसामान्य माणसापेक्षा अधिक चतुर, प्रसंगावधानी, योग्य वेळी योग्य निर्णय घेण्यासाठी तसा विचार करण्याची असामान्य लवचिकता असल्यानेच ही नेते मंडळी इतकी वर्षं राज्याच्या शीर्षस्थानी राहतात ना? मग तरीही माणिकराव कोकाटेंसारख्या प्रकरणात हे स्वतःचा पाय अडकू देतातच कसे? असा प्रश्न राज्यातल्या सर्वसामान्य माणसाला आता उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याबाबतीत पडला आहे. वयाच्या साठीत आले, तेव्हां एका कार्यक्रमात त्यांनी जाहीरपणे आपले काका शरद पवार यांच्यासमोर मनातलं शल्य उघड केलं होतं. 'आम्ही साठीत आलो. आम्हालाही काही कळतं. आमचे निर्णय आता आम्हाला घेऊ द्याना' अशा आशयाचं विधान त्यांनी केलं होतं. पासष्टीत आल्यावर त्यांनी अखेर कंटाळून आपल्या काकांपासून फारकत घेतली आणि स्वतःचं राजकारण सुरू केलं. काकांची ताकद क्षीण केलीच; पण आपण त्यांच्यापासून पूर्ण वेगळे झालो आहोत, हे सिद्ध करण्यासाठी जाहीरपणे त्यांनाच काही खडे बोलही सुनावले! पण, स्वतंत्र पक्षाचं स्वतंत्र राजकारण सुरू केल्यापासून अजितदादांनी घेतलेला एकही निर्णय अजून कौतुकास्पद, राजकीय चातुर्याचा म्हणून वाखाणला गेलेला नाही. उलट, स्वतंत्र झाल्यापासून त्यांच्या आप्तेष्टांपासून जवळच्या आमदारांपर्यंत, पक्षाच्या अनेक पदाधिकाऱ्यांविरोधात सतत काही ना काही आरोप होतच आहेत आणि प्रत्येकवेळी त्यांना शेवटी सामाजिक, राजकीय दबावापोटी कारवाई करावी लागते आहे. प्रदीर्घ राजकीय कारकीर्द असलेल्या, राज्याच्या सर्वोच्च वर्तुळाचा मोठा अनुभव असलेल्या नेत्याबाबत सातत्याने असं का घडतं? असा प्रश्न आता त्यांच्या समर्थकांसह सर्वसामान्य जनतेतही विचारला जाऊ लागला आहे तो त्यामुळेच.

माणिकराव कोकाटे हे काही सरळसाधं व्यक्तिमत्त्व नाही. त्यांची बोलण्यातली अरेरावी, वागण्याबोलण्यातला ताठा, उर्मट भाव जगजाहीर आहे. सिन्नर विधानसभा मतदारसंघ हा सहज जातीय ध्रुवीकरण होणाऱ्या महाराष्ट्रातील प्रमुख मतदारसंघातला एक मतदारसंघ. मतदारसंघातील मतदारांची जात विभागणीही अशी, की एखाद्या उमेदवाराला आकड्यांचा खेळ जमवून, सोबत थोडी साधनसामग्री जोडून विजयाची माळ सहज खेचता येते. माणिकराव हे गणित चाणाक्षपणे खेळून मतदारसंघात पाय रोवून आहेत. गेल्या विधानसभा निवडणुकीवेळी अजितदादांनी बारामती मतदारसंघ सोडून अन्य मतदारसंघाचा विचार सुरू केला, तेव्हां त्यांच्या विचारात सिन्नर मतदारसंघ होता. माणिकरावांनीही अगदी मनापासून दादांना याच मतदारसंघात येण्याचं निमंत्रण दिलं. हे लक्षात ठेवून मंत्रिमंडळाची रचना होताना साहजिकपणे दादांनी माणिकरावांची वर्णी प्राधान्याने लावली. माणिकराव म्हणजे वाद, माणिकराव म्हणजे बोलण्यातून संकट उभं करणारं व्यक्तिमत्त्व हे माहीत असूनही दादांनी त्यांचा समावेश आवर्जून केला. तो पहिल्या महिन्यापासूनच त्यांना भोवतो आहे. कृषी खात्याचं मंत्रीपद असताना शेतकऱ्यांविषयी विधानं, त्यानंतर विधानसभेत कामकाज सुरू असताना भर सभागृहात मोबाईलवर रमी खेळणं यामुळे माणिकराव सतत वादाच्या केंद्रस्थानी आहेतच. या ना त्या कारणांनी माणिकराव स्वतः अडचणीत येतातच, सोबत पक्षालाही अडचणीत आणतात. महायुती सरकारमध्ये अन्य पक्षांना राष्ट्रवादी काँग्रेसला चार गोष्टी सुनवायची संधी यानिमित्ताने मिळते. सतत आरोपांच्या पिंजऱ्यात उभं राहावं लागत असल्याने महायुतीतही चार पावलं मागे राहूनच चालावं लागतं, ही बाब माणिकरावांच्या गावीही नसावी. अन्यथा, युतीधर्म पाळण्यासाठी आपल्या पक्षाला नमतं घ्यावं लागू नये, यासाठी त्यांनी काही दक्षता घेतली असती. तेवढा राजकीय अनुभव नक्कीच त्यांच्या गाठीशी आहे.कोकाटे यांना अटक करण्यासाठी नाशिकच्या पोलिसांनी मुंबईकडे कूच केल्याची बातमी हा अग्रलेख लिहीत असताना आली आहे. ज्यासाठी हे सारं सुरू आहे, ते प्रकरण तीस वर्षांपूर्वीचं आहे. माणिकराव, त्यांचे बंधू विजय आणि त्यांच्या आणखी काही साथीदारांनी अल्प उत्पन्न गटासाठी बांधलेली घरं अयोग्य कागदपत्रं सादर करून मिळवली, असा आरोप आहे. हा आरोप ग्राह्य धरून कनिष्ठ न्यायालयाने माणिकरावांना दोन वर्षांचा तुरुंगवास आणि पन्नास हजार रुपयांची शिक्षा ठोठावली. माणिकरावांनी त्याविरोधात जिल्हा सत्र न्यायालयात दाद मागितली. पण, त्या न्यायालयानेही आधीच्या न्यायालयाचा निकाल कायम केला. भारतीय लोकप्रतिनिधी कायद्यातील कलम आठनुसार कोणत्याही न्यायालयाने कोणत्याही लोकप्रतिनिधीला फौजदारी गुन्ह्यात दोषी ठरवलं, तर त्याला लोकप्रतिनिधी म्हणून अपात्र ठरवलं जातंच; पण पूर्ण शिक्षा भोगून आल्यानंतर सहा वर्षं कोणतीही निवडणूक लढवता येत नाही! जयललिता, लालूप्रसाद यादव, राहुल गांधी, महाराष्ट्रात बबनराव घोलप, सुरेश हळदणकर यांच्याविरोधात कायद्याचा याच पद्धतीने वापर झाला आहे. माणिकराव उच्च, सर्वोच्च न्यायालयात दाद मागतीलही. पण, तोपर्यंत त्यांनी मंत्रीपदावर राहणं अनैतिक आहे. त्यांच्या विधिमंडळ सदस्यत्वाबाबतही निर्णय होणं महायुतीच्या प्रतिमेच्या दृष्टीने महत्त्वाचं आहे. युती–आघाड्यांच्या राजकारणात असे पेच येतात. ते सोडवण्यातच खरं कौशल्य असतं. आपल्यामुळे पुढे काय घडणार आहे, त्याचे राजकीय पडसाद काय उमटतील याचा अंदाज घेऊन माणिकराव वेळीच बाजूला झाले असते, तर त्यांचा आब राहिला असताच; शिवाय अनेकांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभं राहावं लागलं नसतं!

# शिर्डीच्या साई दरबारी विज्ञानाचा चमत्कार! आशियातील सर्वात मोठ्या 'सोलर किचन'मध्ये शिजतोय हजारो भक्तांचा महाप्रसाद

## सूर्यकिरणांवर शिजतो हजारो भक्तांचा स्वयंपाक; 'सबका मालिक एक'च्या मंत्रासह शिर्डीत अखंड अन्नदान;पाहा जगाला हेवा वाटणाऱ्या 'मेगा किचन'ची यशोगाथा

दैनिक वादळ वार्ता
**शिर्डी । तुषार महाजन**




शिर्डीची पावन भूमी ही केवळ श्रद्धा आणि सबुरीचे केंद्र नसून, ती आता मानवतेच्या सेवेचे एक जागतिक विद्यापीठ बनली आहे. साईबाबांच्या 'अन्न हेच पूर्णब्रह्म' आणि 'सबका मालिक एक' या शिकवणीचा वारसा चालवत, श्री साईबाबा संस्थानचे 'प्रसादालय' आज आशिया खंडातील अन्नदानाचा सर्वात मोठा आणि शिस्तबद्ध उपक्रम ठरत आहे. येथे शिजणारा प्रत्येक घास हा केवळ अन्न नसून, तो भक्तांसाठी साक्षात बाबांचा आशीर्वाद ठरत आहे. ६५०० हातांची अविरत सेवा आणि 'सबका मालिक एक'ची साक्ष देणारी शिस्त... हे सर्व पाहून देश-विदेशातील पर्यटक आणि भाविक थक्क होत आहेत.

**विज्ञानाची किमया: सूर्याच्या ऊर्जेवर शिजतो मायेचा घास**

शिर्डीच्या प्रसादालयाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे येथील 'सोलर स्टीम कुकिंग सिस्टीम'. प्रसादालयाच्या छतावर ७३ भव्य सोलर डिश बसवण्यात आल्या आहेत. प्रत्येक डिश सूर्यफुलाप्रमाणे सूर्याच्या दिशेने फिरते आणि उष्णता एका बिंदूवर केंद्रित करते. यातून निर्माण होणाऱ्या ५५० अंश सेल्सिअस तापमानाच्या वाफेवर खाली किचनमध्ये अवघ्या काही मिनिटांत हजारो किलो अन्न शिजवले जाते. या पर्यावरणपूरक यंत्रणेमुळे संस्थानची वर्षाला तब्बल लाखो रुपयांच्या गॅसची बचत होते. पावसाळ्यात किंवा ढगाळ वातावरणात बॅकअप म्हणून एलपीजी बॉयलर्स आणि अत्याधुनिक यंत्रणा सज्ज असते. फाईव्ह स्टार स्वच्छतेचा 'साई-पॅटर्न' येथील किचनमध्ये प्रवेश करताच एखाद्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या फॅक्टरीसारखी शिस्त दिसून येते. स्वयंचलित यंत्रणा: तांदूळ धुण्यासाठी खास इम्पोर्टेड मशिन आहे, जे १० मिनिटांत २०० किलो तांदूळ स्वच्छ करते. तासाला ८०० किलो पीठ दळणारी गिरणी आणि अवघ्या ३ तासांत ३०,००० पोळ्या तयार करणारी ५ आधुनिक मशीन्स येथे रात्रंदिवस धडधडत असतात.हायजीन फर्स्ट: भाजी कापण्यापासून ते ताटे धुण्यापर्यंत (ऑटोमॅटिक डिश वॉशर) सर्वत्र मानवी स्पर्श टाळून स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाते. अन्नाची प्रयोगशाळेत चाचणी (खडज २२००० मानांकन) झाल्यानंतरच ते भक्तांना वाढले जाते.समाजात वावरताना असणारा गरीब-श्रीमंत, उच्च-नीच हा भेद प्रसादालयाच्या विशाल हॉलमध्ये प्रवेश करताच गळून पडतो. एकाच वेळी ५००० भाविक बसू शकतील एवढ्या मोठ्या हॉलमध्ये, एकाच पंगतीत, जमिनीवर बसून आलिशान गाडीतून आलेला उद्योगपती आणि पायी आलेला वारकरी प्रसादाचा आनंद घेतात.

प्रसादाची चव अशी की, जणू साक्षात साईबाबांनीच त्यात आशीर्वाद मिसळला आहे. चिंच-गुळाची आंबट-गोड आमटी, दोन भाज्या, भात आणि तुपातील शिरा... हा मेनू भक्तांना तृप्त करतो. येथे पोट आणि मन दोन्ही भरते, अशी प्रतिक्रिया प्रत्येक भाविक व्यक्त करतो.

**उत्सव काळातील 'मेगा मॅनेजमेंट'**

सामान्य दिवसांत येथे ३० ते ४० हजार भाविक भोजन घेतात. मात्र, गुरुपौर्णिमा, रामनवमी आणि दसरा यांसारख्या सणांना हा आकडा १ लाखाच्या घरात जातो. तरीही कुठेही गोंधळ नाही, आरडाओरडा नाही. शिस्तबद्ध रांगा, मोफत बस सेवा आणि स्वयंसेवकांची विनम्र सेवा यामुळे हे व्यवस्थापन जगातील व्यवस्थापन विद्यार्थ्यांसाठी अभ्यासाचा विषय ठरले आहे.

**अल्पदरात नाश्ता आणि सेवेची व्याप्ती**

संस्थानने केवळ दुपारच्या जेवणाचीच नाही, तर सकाळच्या नाश्त्याचीही सोय केली आहे. सकाळी ६ ते १० या वेळेत अवघ्या ५ रुपयांत नाश्ता पाकीट (पुरी-भाजी-मिठाई). २ रुपयांत चहा, ३ रुपयांत कॉफी आणि दूध. ज्यांना वेळेअभावी घाई आहे, त्यांच्यासाठी पहिल्या मजल्यावर नाममात्र दरात (रु. ५०) व्हीआयपी डायनिंग व्यवस्थाही उपलब्ध आहे.

**'झिरो वेस्ट' मॉडेल आणि बायोगॅस**

उरलेल्या अन्नावर प्रक्रिया करून बायोगॅस निर्मिती केली जाते, ज्यामुळे हे किचन पर्यावरणपूरक 'झिरो वेस्ट' मॉडेलकडे झुकत आहे. विशेष म्हणजे, भक्तीला आधुनिक विज्ञानाची जोड कशी द्यावी, याचा आदर्श या प्रसादालयाने जगासमोर ठेवला आहे. अध्यात्म, विज्ञान आणि सेवाभाव यांचा असा त्रिवेणी संगम जगाच्या पाठीवर क्वचितच पाहायला मिळतो.साईचरणी नतमस्तक होणाऱ्या भक्तांसाठी सुरू असलेला अन्नदानाचा हा महायज्ञ खऱ्या अर्थाने 'सेवा परमो धर्म:' याचे मूर्तिमंत उदाहरण ठरला आहे. येथील आकडेवारी थक्क करणारी आहे. दररोज सरासरी ४० ते ५० हजार, तर उत्सवाच्या काळात १ लाखांहून अधिक भाविक येथे प्रसादाचा लाभ घेतात. या अवाढव्य अन्नदानासाठी रोज ६०० किलो भात, ४०० किलो आमटी, ५०० किलो भाजी आणि १५० किलो शिरा शिजवला जातो. विशेष म्हणजे, आशियातील सर्वात मोठ्या ७३ सोलर डिशच्या प्रकल्पामुळे येथे पर्यावरणाचे रक्षण तर होतेच, शिवाय वर्षाला तब्बल २९ लाख रुपयांच्या इंधनाची बचतही होते. दररोज १ लाख लाडूंचा प्रसाद आणि ६५०० हून अधिक कर्मचारी-स्वयंसेवकांचे अहोरात्र योगदान यामुळे साईंची ही अन्नसेवा जगभरात कीर्तिवंत ठरली आहे.

**शिर्डीचे प्रसादालय : सामाजिक समतेचे आणि सेवाधर्माचे 'जागतिक मॉडेल'!**

श्री साईबाबांची शिर्डी आज केवळ तीर्थक्षेत्र न राहता 'मानवतेची वैश्विक राजधानी' बनली आहे. साईंच्या 'सबका मालिक एक' या महामंत्राचा प्रत्यक्ष अनुभव घ्यायचा असेल, तर संस्थानच्या प्रसादालयासारखे दुसरे ठिकाण नाही. येथे एकाच पंगतीत जेव्हा देशातील दिग्गज उद्योगपती आणि राबणारा कष्टकरी शेतकरी खांद्याला खांदा लावून महाप्रसाद घेतात, तेव्हा सामाजिक विषमतेच्या भिंती आपोआप गळून पडतात. हे केवळ अन्नदान नसून, हे सामाजिक समतेचे एक जिवंत विद्यापीठ आहे.

विशेष म्हणजे, भक्तीला आधुनिक विज्ञानाची जोड कशी द्यावी, याचा आदर्श या प्रसादालयाने जगासमोर ठेवला आहे. आशियातील सर्वात मोठ्या सौर ऊर्जा प्रणालीचा वापर आणि स्वच्छतेचे आंतरराष्ट्रीय निकष पाळून येथे पर्यावरणाचे रक्षण केले जात आहे. साईबाबांनी आपल्या हयातीत स्वतःच्या हाताने हंडीत जेवण शिजवून भक्तांना खाऊ घातले होते. तीच परंपरा आज अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने भव्य स्वरूपात सुरू आहे. शिर्डीचे हे प्रसादालय म्हणजे केवळ एक किचन नाही, तर तो 'श्रद्धा आणि विज्ञानाचा' एक जागतिक चमत्कार आहे. शिर्डीची ओळख आज 'सेवाधर्मी तीर्थक्षेत्र' म्हणून जागतिक स्तरावर अधोरेखित होत आहे, ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे.

**-शब्दांकन आणि लेखन:**
**पत्रकार तुषार संजय महाजन,**
**शिर्डी (७६६६६७५३७०)**

# बोरदमध्ये 'सीसीआय'ला शेतकऱ्यांचा भरघोस प्रतिसाद

## खासगी व्यापाऱ्यांच्या लुटीला लगाम, शेतकऱ्यांना मोठा दिलासा!

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**



तळोदा तालुक्यातील कापूस उत्पादक पट्ट्यासाठी अत्यंत आनंदाची बातमी समोर आली आहे. बोरद येथील 'श्याम फायबर' कापूस मिलमध्ये भारतीय कापूस निगम (सी.सी.आय) तर्फे अधिकृत खरेदी केंद्र नुकतेच कार्यान्वित झाले आहे. या केंद्रामुळे गेल्या अनेक वर्षांपासून खासगी व्यापाऱ्यांच्या मनमानी दरामुळे भरडला जाणाऱ्या शेतकऱ्याला आता हक्काचा हमीभाव मिळत असून, बोरद परिसरातील २६ खेडे आणि १४ पाड्यांमधील शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त होत आहे.

बोरद परिसर हा प्रामुख्याने कापूस, केळी आणि ऊस उत्पादनासाठी प्रसिद्ध आहे. मात्र, परिसरात शासकीय खरेदी केंद्र नसल्याचा फायदा घेत खासगी व्यापारी हमीभावापेक्षा अत्यंत कमी दराने कापूस खरेदी करत होते. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असे. आता सीसीआय केंद्र सुरू झाल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला ७,७०० ते ८,००० रुपयांपर्यंतचा दमदार दर मिळत आहे. यामुळे व्यापाऱ्यांकडून होणाऱ्या लुटीला पूर्णपणे लगाम बसला असून शेतकऱ्यांच्या घामाला योग्य दाम मिळत आहे.

या केंद्रावर खरेदी की प्रक्रिया अत्यंत पारदर्शक आणि शिस्तबद्ध पद्धतीने राबवली जात आहे. केंद्रावर कनिष्ठ व्यावसायिक अधिकारी भार्गव भाग यांची नियुक्ती करण्यात आली असून, नोंदणीसाठी शेतकऱ्यांना केवळ एक दिवस आधी आपला सातबारा उतारा द्यावा लागतो. त्यानंतर दुसऱ्या दिवशी कापसाची आद्रता तपासून तातडीने खरेदी केली जाते. सध्या या केंद्रावर दररोज सरासरी ४०० ते ४५० क्विंटल कापूस खरेदी केला जात असून, आतापर्यंत सुमारे ४,५०० क्विंटल कापसाची विक्रमी खरेदी पूर्ण झाली आहे.खरेदी केल्यानंतर १० दिवसांनी शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम वर्ग होते.

बोरद भागात कापूस खरेदी केंद्र असावे, ही मागणी अनेक दिवसांपासून प्रलंबित होती. यासाठी दै. 'वादळवार्ता ' ने सातत्याने बातम्यांच्या माध्यमातून प्रशासनाचे लक्ष वेधले. शेतकऱ्यांची ही समस्या स्थानिक आमदार राजेश पाडवी यांच्यापर्यंत पोहोचवल्यानंतर त्यांनी केलेल्या विशेष प्रयत्नांमुळे अखेर हे केंद्र मंजूर झाले आहे. या यशस्वी पाठपुराव्यामुळे शेतकरी बांधवांकडून लोकप्रतिनिधी आणि दै. 'वादळवार्ता ' विशेष कौतुक केले जात आहे.

शाम फायबरचे संचालक सुमित अग्रवाल यांच्या जिनिंग प्रेसमध्ये केवळ कापूस खरेदीच होत नाही, तर तिथे कापसाच्या गाठी तयार करण्याचे कामही युद्धपातळीवर सुरू आहे. या प्रक्रियेमुळे केवळ शेतकऱ्यांचाच फायदा झाला नसून, परिसरातील अनेक बेरोजगार तरुणांना हाताला काम मिळाले आहे. एका बाजूला कापसाला चांगला भाव आणि दुसऱ्या बाजूला स्थानिकांना रोजगार, अशा दुहेरी फायद्यामुळे बोरद परिसरातील ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवचैतन्य मिळाले आहे.

# सोयाबीन,कापूस भाव वाढीसाठी बीड जिल्हाधिकारी कार्यालया वर निघणाऱ्या शेतकरी हक्क मोर्चात हजारोंच्या संख्येने सहभागी व्हा-करपे

## घाटसावळी,लिंबागणेश ,मुळुकवाडी,दगडगाव,औरंगपूर (कुकडा),कुक्कडगाव येथे शेतकऱ्यांच्या बैठकांना उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**




कापूस,सोयाबीन आदी शेतमालाला वाढीव दर मिळावा,सीसीआय व जिनिंग केंद्रांवरील शेतकऱ्यांची प्रतवारी वरुन होणारी अडवणूक थांबवावी,किमान आधारभूत दरापेक्षा कमी दराने शेतमाल खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कठोर कारवाई करावी तसेच कापूस व सोयाबीन ची परदेशातून होणारी आयात तात्काळ बंद करावी,आंतरराष्ट्रीय बाजारात शेतमालाचे आयात निर्यात धोरणात आवश्यक बदल करावेत. अनेक अशा प्रमुख मागण्यांसाठी गुरुवारी दि.२५ डिसेंबर रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालया वर काढण्यात येणाऱ्या शेतकरी हक्क मोर्चा मध्ये शेतकरी,शेतकरी पुत्र, शेतकरी मित्र तसेच शेतकऱ्यांप्रति संवेदनशील सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांनी केले. बीड व गेवराई तालुक्यातील अनुक्रमे घाटसावळी,लिंबागणेश दगडगाव,औरंगपूर (कुकडा),कुक्कडगाव येथे गुरुवारी दि.१८,१९ रोजी शेतकऱ्यांच्या बैठका संपन्न झाल्या.सर्वच गावातील शेतकऱ्यांनी बैठकांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.बैठकीत शेतकरी हक्क मोर्चाचे आंदोलन समिती सदस्य, राजेंद्र आमटे,सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर,माजी सैनिक अशोक येडे, शेतकरी नेते रामेश्वर गाडे , अरूण आबा लांडे, बाळासाहेब मोरे पाटील, सुहास जायभाये,नंदू शिंदे,रामप्रसाद गाडे यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर भूमिका मांडली.

यावेळी बोलताना कुलदीप करपे म्हणाले की,केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांमुळे शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक होत आहे. खाजगी व्यापाऱ्यांकडून किमान आधारभुत दरा पेक्षा कमी दरात शेतमाल खरेदी होत असताना पणन विभाग बघ्याची भूमिका घेत आहे. सरकारने कापसाला १२ हजार,सोयाबीनला ७ हजार प्रति क्विंटल भाव जाहीर करावा.राष्ट्रीयकृषी विकास योजनेतून थकीत असलेले ठिबक व तुषार सिंचनाचे अनुदान द्यावे, वन्य प्राण्यांपासुन संरक्षण करण्यासाठी शेतीला पक्के ताराचे कंपाउंड करावे,शेत रस्ते,बांध रस्ते निर्विवाद करावेत.थकीत पीकविमा नुकसान भरपाई तात्काळ द्यावी, अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या खरडून गेलेल्या शेतजमीनीचे पुनर्भरण करून तात्काळ द्यावे, कृषीपंपाला दिवसाअखंड ८ तास उच्च दाबाने वीज द्यावी आदि मागण्यासाठी येत्या २५ डिसेंबर २०२५ रोजी गुरुवारी सकाळी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकरी हक्क मोर्चा आयोजित केला आहे.सर्व शेतकऱ्यांनी हजारोंच्या संख्येने उपस्थितराहण्याचे आवाहन क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांनी केले आहे.

# बोगस दिव्यांग कर्मचाऱ्यांची गय करणार नाही; समाज कल्याण अधिकाऱ्यांचा इशारा

## जागतिक दिव्यांग दिन पंधरवडा कार्यक्रम उत्साहात; शिवाजी नाट्यगृहात प्रशासकीय अधिकाऱ्यांची उपस्थिती

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांच्या समस्यांचे निराकरण करणे ही माझी जबाबदारी आहे. बोगस दिव्यांग प्रमाणपत्रांच्या आधारे नोकरी मिळवणाऱ्या कर्मचाऱ्यांची चौकशी सुरू करण्यात आली असून, अशा प्रकरणांमध्ये कुणाचीही गय केली जाणार नाही, असे रोखठोक प्रतिपादन जिल्हा समाज कल्याण अधिकारी तथा दिव्यांग सक्षमीकरण पालक अधिकारी नंदकिशोर सुर्यवंशी यांनी केले.राष्ट्रीय दिव्यांग विकास महासंघ, जिल्हा शाखा नंदुरबारच्या वतीने जागतिक दिव्यांग दिन पंधरवडा कार्यक्रमाचे आयोजन शिवाजी नाट्यगृहात करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रांताधिकारी अंजली शर्मा, जिल्हा पुरवठा अधिकारी विशाल भगत, जिल्हा आगार प्रमुख संदीप निकम आदी मान्यवर उपस्थित होते.

जिल्हा परिषदेच्या माध्यमातून १ टक्के निधी वेगळा करण्यात आला असून, ५ टक्के निधी साहित्य वाटपासाठी राखून ठेवण्यात आला आहे. आता आठवड्यातून तीन दिवस (सोमवार, बुधवार, शुक्रवार) ऑनलाइन प्रमाणपत्र दिले जातील. तसेच नवापूर आणि तळोदा ग्रामीण रुग्णालयातही ही सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. जिल्हा उद्योग केंद्रातर्फे दिव्यांगांसाठी विविध कर्ज योजनांचे प्रस्ताव बँकांकडे पाठवून त्यांना अर्थसाहाय्य मिळवून देण्यासाठी सहकार्य केले जाईल. दिव्यांगांच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी गुगल फॉर्मद्वारे नोंदणी करणे अनिवार्य असून, जास्तीत जास्त बांधवांनी ही नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले.

**अन्यायाविरुद्ध लढा देऊ : शिवाजीराव मोरे**



महासंघाचे राज्य उपाध्यक्ष शिवाजीराव मोरे यांनी प्रास्ताविकात दिव्यांगांच्या अनेक प्रलंबित प्रश्नांवर प्रकाश टाकला. ५ टक्के निधीचे योग्य वाटप न होणे, अंत्योदय योजनेसाठी होणारी पायपीट आणि बँकांकडून मिळणारी चुकीची वागणूक यावर त्यांनी संताप व्यक्त केला. मात्र, जिल्हाधिकारी मित्तली सेठी यांच्या सकारात्मक सहकार्याबद्दल त्यांनी आभार मानले. मोरे यांची जिल्हा दिव्यांग शासकीय समितीवर निवड झाल्याबद्दल यावेळी त्यांचे कौतुक करण्यात आले.

जिल्हा आगार प्रमुख संदीप निकम यांनी बस प्रवासा सवलतीचा गैरफायदा घेणाऱ्या बोगस दिव्यांगांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा दिला. ज्यांच्याकडे अधिकृत आधार कार्ड असेल त्यांनाच लाभ दिला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून विविध क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळवलेल्या चार दिव्यांग बांधव व भगिनींचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शंकर निकाडजे यांनी केले, तर आभार प्रदर्शन मंगेश वाघमारे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हाध्यक्ष राजाभाऊ कुवर, मंगेश वाघमारे, अरविंद शिंदे, वकील पाटील व महासंघाच्या ५० पदाधिकाऱ्यांच्या टीमने परिश्रम घेतले.

# प्रज्ञा सातव यांचा भाजपमध्ये प्रवेश–रवींद्र चव्हाण, मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंची हजेरी

**मुंबई । प्रतिनिधी**

काँग्रेसचे दिवंगत नेते राजीव सातव यांच्या पत्नी आमदार डॉक्टर प्रज्ञा सातव यांनी आज आपल्या विधानपरिषद सदस्यत्वाचा राजीनामा देत भाजपमध्ये प्रवेश केला. त्यांनी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत भाजपचे कमळ हाती घेतले. सातव यांच्या भाजप प्रवेशामुळे काँग्रेसला जबर झटका बसला आहे.प्रज्ञा सातव या गत काही महिन्यांपासून सातत्याने काँग्रेसवर नाराज होत्या. त्यामुळे त्या काँग्रेसला सोडचिठ्ठी देऊन भाजपमध्ये प्रवेश करतील अशी चर्चा सुरू झाली होती. त्यानुसार, त्यांनी आज सकाळीच त्यांनी विधिमंडळ सचिवालयाकडे आपल्या विधानपरिषद सदस्यत्वाचा राजीनामा सुपूर्द केला. प्रज्ञा सातव यांचे पती राजीव सातव हे काँग्रेस नेते राहुल गांधी यांचे निकटवर्तीय होते. त्यामुळे त्यांचा राजीनामा हा काँग्रेससाठी जबर झटका असल्याचे मानले जात



आहे.काँग्रेसच्या विधानपरिषद सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यानंतर प्रज्ञा सातव यांनी भाजप प्रदेश कार्यालयात जाऊन भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला. यावेळी त्यांच्यासोबत हिंगोलीचे त्यांचे समर्थकही उपस्थित होते. हे सर्वजण काल सायंकाळीच मुंबईत पोहोचले होते. यावेळी बोलताना प्रज्ञा सातव यांनी भाजपश्रेष्ठींना यापुढे आपण सबका साथ, सबका विकास, सबका प्रयास व सबका विश्वास या धोरणानुसार वाटचाल करण्याची ग्वाही दिली.चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी विकसित हिंगोलीसाठी प्रज्ञा सातव यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याचे स्पष्ट केले. हिंगोली हा विकासापासून कमजोर झालेला जिल्हा आहे. या जिल्ह्याच्या विकासासाठी राजीव सातव यांनी आपले आयुष्य वेचले. त्यांनी जिल्ह्यातील बारा बलुतेदार व कष्टकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रचंड मेहनत व प्रचंड कष्ट घेतले. एखादा सज्जन व्यक्ती कसा असावा हे आपल्याला सातव यांच्या रुपाने पाहावसाय मिळाले.

प्रज्ञा सातव यांनी त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मोठी मेहनत केली. मागच्या ३० वर्षांपासून त्यांनी राजीव सातव यांच्या खांद्याला खांदा लावून हिंगोली जिल्ह्याच्या शेतकरी, शेतमजूरांचे प्रश्न सोडवण्याचे काम केले. त्यांनी विकसित महाराष्ट्राला विकसित हिंगोली जोडण्यासाठी भाजपमध्ये प्रवेश केला, असे ते म्हणाले.

# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सनसनाटी करण्याचा केविलवाणा प्रयत्न–शंभूराज देसाई

**मुंबई । प्रतिनिधी**

सातारा जिल्ह्यात सावरी या गावात राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे बंधू प्रकाश शिंदे यांच्या रिसॉर्टजवळ एका शेडमध्ये जवळपास १४५ कोटींचे ड्रग्स आढळून आले. यावरून शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी थेट एकनाथ शिंदे यांच्यासह प्रकाश शिंदे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. तसेच एकनाथ शिंदे यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी अंधारे यांनी केली. तसेच यावर आता शिवसेना शिंदे गटाचे नेते व मंत्री शंभूराज देसाई यांनी सुषमा अंधारे यांच्या आरोपांवर पलटवार केला आहे.



शंभूराज देसाई म्हणाले, शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी आमचे नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांचे बंधू प्रकाश शिंदे यांच्यावर जे बेछूट आरोप केले आहेत, त्यावर मी कालच प्रतिक्रिया दिली होती. त्यावर आज पत्रकार परिषद घेऊन सुषमा अंधारे यांनी त्याच आरोपांचे रीपीटेशन केले आहे. केवळ राज्यात निवडणुका सुरू आहेत म्हणून या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सनसनाटी निर्माण करण्याचा हा एक केविलवाणा प्रयत्न अंधारे करत आहेत.

पुढे बोलताना शंभूराज देसाई म्हणाले, मागे सुद्धा दोन वर्षांपूर्वी जेव्हा एकदा नाशिकमध्ये ड्रग्स प्रकरण घडले होते, तेव्हा उत्पादन शुल्क मंत्री मी होतो आणि माझा थेट संबंध आहे अशा पद्धतीचे बेछूट आरोप त्यावेळी सुषमा अंधारे यांनी केला होता. ज्यावेळी मी या आरोपांच्या विरोधात जाहीरपणे सांगितले की तुमचे हे विधान ४८ तासांत मागे घ्या, माफी मागा नाहीतर कायदेशीर कारवाईला सामोरे जा आणि ही कायदेशीर कारवाई न्यायालयात सुरू असल्याची माहिती देसाई यांनी दिली आहे.

# पृथ्वीराज चव्हाणांचे विधान देशभक्ती नव्हे देशद्रोह–एकनाथ शिंदेंची टीका

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई (प्रतिनिधी)**–काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताचा पराभव झाल्यासंबंधी केलेल्या विधानाचा सत्ताधारी शिवसेनेचे सर्वेसर्वा तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निषेध केला आहे. काँग्रेस नेत्याचे विधान देशभकर्ती नव्हे तर देशद्रोह आहे. त्यांच्या विधानाच्या पाकिस्तानात हेडलाईन्स झाल्या आहेत, असे त्यांनी म्हटले आहे.पृथ्वीराज चव्हाण यांनी काल पुण्यातील पत्रकारांशी संवाद साधला होता. त्यात त्यांनी ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकने भारताचा पराभव केल्याचा धक्कादायक दावा केला होता. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकविरोधात ऑपरेशन सिंदूर राबवले होते. पण या मोहिमेच्या पहिल्याच दिवशी म्हणजे ७ मे रोजी अर्ध्या तासातच आपली काही विमाने पाडण्यात आली, असे ते म्हणाले होते. त्यांच्या या विधानामुळे राज्यासह देशात एकच खळबळ माजली होती. या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांनी आज पत्रकारांशी संवाद साधताना त्यांच्यावर निशाणा साधला आहे.ते म्हणाले, लष्करी जवानांनी उत्तर दिल्यानंतर अशा प्रकारचे विधान काँग्रेसकडून होणे ही अत्यंत चिंताजनक व दुर्दैवी बाब आहे. देशविघातक बाब आहे. हे देशप्रेम नव्हे तर पाकिस्तान प्रेम आहे. त्यामुळे काँग्रेसच्या नेत्यांनी ऑपरेशन सिंदूरविषयी केलेल्या विधानाच्या पाकिस्तानात हेडलाईन्स झाल्या. त्यामुळे पाकिस्तानी बोली बोलणाऱ्यांना हिंदुस्तानची जनता माफ करणार नाही. त्यांना त्यांची जागा दाखवल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनीही लष्कराच्या पाकवरील कारवाईचा हिशोब विचारला होता. किती ड्रोन पडले, किती विमाने पडली, किती तासांत युद्ध थांबले? त्यांनी लष्कराच्या मागे उभे राहण्याची गरज होती.

### खा.प्रतिभा धानोरकर यांनी दिल्ली येथे केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांची घेतली भेट

# 'उमेद'ला स्वतंत्र विभागाचा दर्जा अन् कर्मचाऱ्यांना सुरक्षा कवच द्या

दैनिक वादळ वार्ता
**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातील (उमेद) हजारो कर्मचाऱ्यांच्या आणि ८४ लाख ग्रामीण कुटुंबांच्या भवितव्यासाठी खासदार प्रतिभा धानोरकर यांनी दिल्ली येथे केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांची भेट घेतली. 'उमेद'मधील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे शोषण थांबवून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी खासदारांनी थेट केंद्रीय स्तरावर हा प्रश्न मांडला असून, यावर सकारात्मक मार्ग काढण्याचे आश्वासन मंत्री महोदयांनी दिले आहे.उमेद अभियानांतर्गत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना शासकीय समकक्ष पदांचा दर्जा मिळावा आणि या अभियानाला स्वतंत्र विभागाची मान्यता द्यावी, ही मुख्य मागणी खासदार प्रतिभा धानोरकर यांनी यावेळी लावून धरली. मार्च २०२६ नंतर समुदाय संसाधन व्यक्तींचे मानधन शासनाकडून बंद करून ते लोकसंचलित संस्थांमार्फत देण्याचा जो निर्णय झाला आहे, तो रद्द करण्याची विनंती त्यांनी केली. तसेच, आशा स्वयंसेविकांप्रमाणेच 'उमेद'च्या कर्मचाऱ्यांना १० लाख रुपयांचे विमा संरक्षण लागू करावे आणि ग्रामस्तरावरील महिलांना 'ग्राम सखी' म्हणून अधिकृत ओळखपत्र द्यावे, याकडे त्यांनी लक्ष वेधले.या भेटीदरम्यान खासदार



प्रतिभा धानोरकर यांनी कर्मचाऱ्यांच्या पगारातील अनियमितता, प्रलंबित पदोन्नती आणि बदली प्रक्रिया यांसारख्या तांत्रिक व प्रशासकीय अडचणींची माहिती मंत्र्यांना दिली. केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी या सर्व मागण्या गांभीर्याने ऐकून घेतल्या आणि ८४ लाख कुटुंबांच्या हितासाठी केंद्र सरकार यावर नक्कीच सकारात्मक तोडगा काढेल, असे आश्वासन दिले. खासदारांच्या या आक्रमक पाठपुराव्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून आंदोलनाच्या पवित्र्यात असलेल्या उमेद कर्मचाऱ्यांमध्ये आता आशेचा किरण निर्माण झाले आहे.

# अंबरनाथमध्ये मुख्यमंत्र्यांच्या सभेआधी गोळीबार;घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद

दैनिक वादळ वार्ता
**बदलापूर । प्रतिनिधी**

न्यायालयाच्या आदेशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थाचे निवडणुकीचे बिगुल वाजल्यानंतर अंबरनाथ नगरपालिकेची निवडणूक अंतिम टप्प्यात असताना आता शहरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. भाजपाचे उमेदवार पवन वाळेकर यांच्या खाजगी कार्यालयावर दोन अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केला आहे. या प्रकरणामुळे शहरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.अंबरनाथ पश्चिमेकडील नवीन भेंडी पाडा या परिसरात पवन वाळेकर यांचे कार्यालय आहे. बुधवारी रात्री १२.१५ च्या सुमारास भाजप उमेदवार पवन वाळेकर हे कार्यकर्त्यांसोबत कार्यालयात उपस्थित होते. त्याचवेळी दोन अज्ञात व्यक्ती दुचाकीवरुन आल्या आणि त्यांनी कार्यालयाच्या दिशेने गोळीबार करण्यास सुरुवात केली. यावेळी हल्लेखोरांनी कार्यालयावर कमीतकमी ४ ते ५ राऊंड फायर केले. सुदैवाने या गोळ्या कार्यालयाच्या समोरच्या काचेवर आणि काही भागांवर लागल्या. तसेच गोळीबार सुरू होताच वाळेकर आणि कार्यकर्त्यांनी तात्काळ




सावधगिरी बाळगल्याने कोणालाही दुखापत झाली नाही. त्यामुळे जीवितहानी टळली. गोळीबार केल्यानंतर हल्लेखोर तातडीने घटनास्थळावरून पसार झाले.भाजपच्या उमेदवाराच्या कार्यालयावर गोळीबार करुन दहशत पसरवण्याचा प्रयत्न करण्यात आला असल्याची प्राथमिक माहिती आहे व अज्ञातांनी गोळीबार केल्याची धक्कादायक घटना घडली. ही घटना सीसीटिव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.

एकीकडे निवडणुकांची जोरदार तयारी सुरू असताना झालेल्या या हल्ल्यामुळे शहरात खळबळ उडाली आहे. त्याचबरोबर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित झाला आहे घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ तपास सुरू केला आहे. या गोळीबार प्रकरणी अंबरनाथ पश्चिम पोलीस ठाण्यात अज्ञात हल्लेखोरांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दहशत निर्माण करणे किंवा उमेदवाराला धमकी देणे हा या गोळीबारामागील मुख्य उद्देश असावा, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. हा संपूर्ण प्रकार कार्यालयाच्या परिसरात लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. पोलिसांनी फुटेज ताब्यात घेतले असून, त्याआधारे हल्लेखोरांची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे.या घटनेचे गांभीर्य लक्षात घेत, पोलिस प्रशासनाने तात्काळ सूत्रे हलवली आहेत. आरोपींना लवकरात लवकर पकडण्यासाठी स्थानिक अंबरनाथ पोलीस पथकासह, बदलापूर पोलीस पथक आणि गुन्हे शाखेचे विशेष पथक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही पथके वेगवेगळ्या दिशेने आरोपींचा शोध घेत आहेत. आरोपींना शहरातून पळून जाण्यापासून रोखण्यासाठी परिसरातील प्रमुख रस्त्यांवर आणि नाक्यांवर तात्काळ नाकाबंदी करण्यात आली आहे. तसेच गोळीबार झालेल्या नवीन भेंडी पाडा परिसरातील रस्ता पोलिसांनी सील केला असून फॉरेन्सिक विभागाकडून पुरावे गोळा करण्याचे काम सुरू आहे. सध्या पोलिसांकडून आरोपींचा कसून शोध सुरू आहे. या घटनेमागे नेमका कोणाचा हात आहे आणि त्याचा निवडणुकीशी काय संबंध आहे, याचा तपास सुरू आहे.

# भारतात वैज्ञानिक पिढी घडवण्यासाठी विज्ञान प्रदर्शने काळाची गरज-गटविकास अधिकारी राजू किरवे

## तळोदा तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचा समारोप; ६३ उपकरणांमधून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे दर्शन

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

विज्ञानाने मानवाचे कष्टमय जीवन अत्यंत सुखकर केले आहे. विज्ञान प्रदर्शनांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील प्रयोगशीलता, विचारशक्ती आणि नाविन्यपूर्णतेला मोठी संधी मिळते. जर आपल्याला भविष्यात भारताची सक्षम वैज्ञानिक पिढी घडवायची असेल, तर अशा विज्ञान प्रदर्शनांचे आयोजन तळागाळापर्यंत व्हायला हवे, असे प्रतिपादन तळोदा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी राजू किरवे यांनी केले. तळोदा तालुका माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ, देवमोगरा विद्याप्रसारक मंडळ संचलित गुलाबबाई दुल्लभ राजकुळे कन्या विद्यालय आणि शिक्षण विभाग (पंचायत समिती) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय 'तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन २०२५,२६' चा समारोप व पारितोषिक वितरण सोहळा नुकताच पार पडला. 'पितृछाया विज्ञान नगरी' मध्ये संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.कार्यक्रमाची सुरुवात देवमोगरा विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष चेतन पवार यांच्या हस्ते दीपप्रज्वलाने झाली. यावेळी व्यासपीठावर गटशिक्षणाधिकारी शेखर धनगर, कॉलेज ट्रस्टचे उपाध्यक्ष रोहित माळी, शिक्षण विस्तार अधिकारी वसंत जाधव, आरती शिंपी, संस्थेच्या उपाध्यक्षा प्रतिभा मगरे, संस्था समन्वयक निमेश सूर्यवंशी, संचालक महेश मगरे, उमाकांत शेंडे, रामचंद्र राणे आदी मान्यवर उपस्थित होते.

आपल्या भाषणात राजू किरवे पुढे म्हणाले की, आज विद्यार्थ्यांनी सादर केलेली उपकरणे ही केवळ मॉडेल्स नसून त्यांच्या भविष्यातील मोठ्या संशोधनांच्या नवकल्पना आहेत. ज्या विद्यार्थ्यांचे गणित आणि विज्ञान हे विषय पक्के असतात, त्यांना जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात अपयशाचा सामना करावा लागत नाही.

**प्रदर्शनातील सांख्यिकी आणि विषय:**– या प्रदर्शनाचा मुख्य विषय 'समाजासाठी विज्ञान व तंत्रज्ञान' हा होता. यामध्ये तालुक्यातील विविध शाळांमधून एकूण ६३ उपकरणे सादर करण्यात आली होती.

प्राथमिक गट: ३३ उपकरणे



माध्यमिक गट: २४ उपकरणे

शिक्षक गट (प्राथमिक व माध्यमिक): ५ उपकरणे

प्रयोगशाळा परिचर गट: १ उपकरण

परीक्षक म्हणून डॉ. दीपक शेंडे, प्रा. डॉ. एस. के. श्रीवास्तव, प्रा. डॉ. एस. पी. वाणी आणि योगेश पवार यांनी काम पाहिले. निवड झालेले मुख्य

**विजेते**

१. प्राथमिक विद्यार्थी गट (इ. ६ वी ते ८ वी):

प्रथम: आयुष योगेश कर्णकार (श्रीमोती प्राथमिक विद्यामंदिर, तळोदा) – विषय: नैसर्गिक शेती व जोड व्यवसाय.

द्वितीय: माही राकेश जाधव (न्यू हायस्कूल, तळोदा) – विषय: रेन वॉटर हार्वेस्टिंग.

तृतीय: प्रतीक्षा चव्हाण व चमू (गुलाबबाई राजकुळे कन्या विद्यालय) – विषय: शाश्वत शेती.

२. माध्यमिक विद्यार्थी गट (इ. ९ वी ते १२ वी):

प्रथम: ओजस्वी आनंद मगरे (नेमसुशील माध्यमिक विद्यालय, तळोदा) – विषय: स्वच्छ बस व स्वस्थ जीवन.

द्वितीय: जानवी मोहन पवार (नेमसुशील इंग्लिश मीडियम स्कूल) – विषय: इलेक्ट्रिसिटी जनरेशन.

तृतीय: आराधना विलास वसावे (ए. जी. ई. माळी कनिष्ठ महाविद्यालय) – विषय: नैसर्गिक डास प्रतिबंधक अगरबत्ती.

३. शिक्षक व परिचर गट:

प्राथमिक शिक्षक: अनिल सिताराम सोनवणे (जि. प. शाळा रेवानगर) – विषय: स्टेम एज्युकेशन.

माध्यमिक शिक्षक: निशा भास्कर करे (आश्रम शाळा तलावडी) – विषय: थ्रीडी मॅथ शेप्स.

प्रयोगशाळा परिचर: ए. बी. खाटीक (आश्रम शाळा नर्मदानगर) – विषय: ऑटोमॅटिक वॉटर टॅब.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक मिलिंद ढोडरे यांनी केले, तर सूत्रसंचालन सुजाता साळवे यांनी केले. आभार प्रदर्शन प्राचार्य निलेश सूर्यवंशी यांनी मानले. प्रदर्शनाच्या यशस्वीतेसाठी कन्या विद्यालयाच्या सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले. यावेळी मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष नरोत्तम मराठे, सचिव सुनील परदेशी यांच्यासह तालुक्यातील विद्यार्थी, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केज तालुक्यात वेळ अमावस्या आनंदात साजरी



दैनिक वादळ वार्ता

**गौतम बचुटे । केज**

केज तालुक्यात शेतकऱ्यांनी वेळ अमावस्या मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात संपन्न झाली. या बाबत माहिती अशी की, रब्बी हंगामात शेतकरी वेळापूरी अमावस्याही वेळ अमावस्य म्हणून साजरी करतात. या दिवशी शेतकरी आपल्या इष्टमित्र नातेवाईकांसह शेतात वनभोजनाचा आनंद घेतात. शेतातील वनदेवतेची मनोभावे पूजा करून खीर, कढी, नागदिवे, वेगवेगळ्या भाज्या आणि गोडधोड पदार्थ जेवणात असतात. अशा प्रकारे केज तालुक्यात वेळ अमावस्या साजरी करण्यात आली. या वर्षी चांगला समाधानकारक पाऊस पडल्याने विहिरी डबडबलेल्या आहेत तर नद्यांना चांगले पमी असून परिसरातील तलाव पूर्ण क्षमतेने भरलेले आहेत. यावर्षी खरिपाची पिकेही समाधानकारक आली. तसेच आता रब्बीची पिके डौलात आहेत. त्यामुळे शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण आहे. म्हणून या वर्षीची वेळा पुरी अमावस्या चांगली साजरी झाली. परिसरातील नौकरवर्ग आणि उद्योग व्यवसाया निमित्त परगावी असेलेले शेतकरी व त्यांचे नातेवाईक देखील याचा आंनद लुटतान दिसून आले. तर बच्चे कंपनींनी दंगा मस्ती करीत आनंद घेतला.

# रिल स्टार आशिष मुंडे यांची गळफास घेऊन आत्महत्या ममदापूर गावावो शोककळा

दैनिक वादळ वार्ता

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई तालुक्यातील ममदापूर येथील तरुण रिल स्टार आशिष मुंडे यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे.या दुःखद घटनेमुळे संपूर्ण ममदापूर गावावर शोककळा पसरली असून नागरिकांमध्ये तीव्र हळहळ व्यक्त होत आहे.आशिष मुंडे हे सोशल मीडियावर रिल्सद्वारे परिचित होते.त्यांच्या अकाली निधनाने मित्र परिवार,चाहत्यांमध्ये मोठा धक्का बसला आहे. घटनेची माहिती मिळताच परिसरात एकच शोककळा पसरली.या घटनेनंतर कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून त्यांच्या पश्चात आई-वडील,भाऊ आणि दोन बहिणी असा परिवार आहे.आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, या दुर्दैवी घटनेमुळे ममदापूर सह अंबाजोगाई तालुक्यात शोक व्यक्त केला जात आहे.



# साक्रीत विधी सेवा समिती व जिजामाता कन्या विद्यालयाची संयुक्त जनजागृती रॅली



**धुळे । प्रतिनिधी**

साक्री शहरात तालुका विधी सेवा समिती, साक्री आणि जिजामाता कन्या विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. ही रॅली महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, धुळे यांच्या मार्गदर्शनाखाली मा. माधुरी आनंद यांच्या संकल्पनेतून, तसेच तालुका विधी सेवा समितीच्या अध्यक्षा मा. मुग्धा एम. गांगुर्डे यांच्या नेतृत्वात काढण्यात आली. विद्यार्थिनींनी 'बेटी बचाव, बेटी पढाव', 'मुलगा-मुलगी समान' आदी घोषवाक्यांतून सामाजिक संदेश दिला. न्यायालय परिसरात झालेल्या समारोपात मुग्धा गांगुर्डे यांनी कायदेविषयक मार्गदर्शन केले. सह न्यायाधीश एम. आर. गाढवे, वकील संघ अध्यक्ष ॲड. सुनिल नांद्रे, उपाध्यक्ष ॲड. ए. डी. जाधव, मुख्याध्यापिका बी. पी. पवार उपस्थित होत्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक विजय सोनवणे, एस. बी. अहिरे आदींचे परिश्रम व विधी स्वयंसेवक दिपाली बोरसे, प्रतिक्षा सोनवणे, महेंद्रसिंह चंदेल यांचे सहकार्य लाभले

# सातपुडयाच्या कुशीतील डाब व वालंबा परिसरात दवबिंदू गोठले

## ठिकठिकाणी गवताने पांघरली बर्फची चादर

दैनिक वादळ वार्ता

**रवींद्र वळवी मोलगी । प्रतिनिधी**

डाब परिसरात थंडीचा जोर वाढला असुन तापमानाचा पारा खालावला आहे त्यामुळे शुक्रवारी पहाटेच्या सुमारास डाब वालंबा येथील नदीच्या परिसरात ठिक ठिकाणी गवतावर दव बिंदु गोठून गवतावर बर्फाची चादर पसरल्याचे दिसले.



साधारणपणे जानेवारी महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात सातपुड्याच्या डाब परिसरात दव बिंदू गोठतात मात्र या वर्षी डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात कडाक्याची थंडी पडल्याने सुमारे दोन आठवडे आधीच दवबिंदु गोठल्याने परिसरातील गवतावर बर्फाची चादर पसरली. ठिक ठिकाणी वाहनांच्या टपावर देखील बर्फ साचल्याचे दिसुन आले. एरव्ही तापमान ४ अंशा पेक्षा कमी राहिल्यास दव बिंदू गोठण्याची प्रक्रिया सुरु होते. असे हवामान तंज्ञांनी सांगितले.

सातपुड्याच्या कुशीत वालंबा डाब या ठिकाणी दरवर्षी किमान एक वेळा तरी तापमान ४ अंशा पक्षा खाली जाऊन दव बिंदू गोठतात असे हवामान तज्ञांचे म्हणणे आहे. या परिसरात तापमान नोंदीची कोणतीही संसाधने उपलब्ध नसल्याने या परिसरात किती तापमान असते याबाबत निश्चित माहिती उपलब्ध होत नाही. त्यामुळे शासनाने या परिसरात तापमापक यंत्र कार्यान्वित करावे अशी मागणी होतेय.

## तीन वर्षांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश

# सोनीजवळा येथे ३३ के.व्ही.सबस्टेशन साठी जमिनीची मोजणी पूर्ण

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील सोनीजवळा येथे मागील तीन वर्षांपासून सुरू असलेल्या सातत्यपूर्ण पाठपुरावा व मागणीला अखेर यश येत असून ३३ के.व्ही.वीज उपकेंद्र (सबस्टेशन) उभारणीच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकण्यात आले आहे. शुक्रवार दि.१९ डिसेंबर २०२५ रोजी सोनीजवळा येथे प्रस्तावित ३३ के.व्ही. सबस्टेशनसाठी ग्राम पंचायतीच्या वतीने दोन एकर गायरान जमिनीची अधिकृत मोजणी करण्यात आली.ही जमीन केज तहसीलदारांच्या मार्फत महावितरण कार्यालयाकडे वर्ग करण्यासाठी मोजणी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.यामुळे सोनीजवळा व परिसरातील गावांना भविष्यात अखंडित वीज पुरवठा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.या उपक्रमासाठी महाराष्ट्र



राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उप मुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार, आमदार सौ.नमिताताई मुंदडा,बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. मोजणीच्या वेळी केज तहसीलचे तहसीलदार श्री.राकेश गीड्डे,मंडळ अधिकारी श्री.हजारे, तलाठी वाघमारे मॅडम, कवडे मॅडम तसेच महा वितरणचे अधिकारी उपस्थित होते.गावच्या सरपंच सौ.जान्हवीताई गोविंद ससाणे,उपसरपंच स्वाती दादासाहेब कोकाटे ग्रामपंचायत सदस्य,माजी सरपंच व माजी उप सरपंच,विविध राजकीय व सामाजिक पदाधिकारी, शेतकरी व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सबस्टेशनमुळे शेती, उद्योगधंदे व घरगुती वीज पुरवठ्यास मोठा फायदा होणार असून परिसराच्या विकासाला गती मिळणार आहे.या यशस्वी प्रक्रिये साठी योगदान दिलेल्या सर्व अधिकारी,लोक प्रतिनिधी,ग्रामपंचायत पदाधिकारी,गावकरी, शेतकरी व युवकांचे आभार दादासाहेब ससाणे शिवसेना विधानसभा प्रमुख केज यांनी व्यक्त केले आहेत.

# मनोविकार तज्ञ डॉ.राजेश इंगोले यांची मराठी पत्रकार परिषदेच्या वैद्यकीय कक्षाच्या राज्य उपाध्यक्षपदी नियुक्ती ; सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव

दैनिक वादळ वार्ता

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथील सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ञ डॉ.राजेश इंगोले यांची अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वैद्यकीय कक्षाच्या राज्य उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.ही नियुक्ती नुकत्याच वडवणी तालुक्यातील देवडी येथे पार पडलेल्या पुरस्कार वितरण व पत्रकार गुणगौरव सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते जाहीर करून त्यांना नियुक्तीपत्र सुपूर्द करण्यात आले.या निवडीमुळे अंबाजोगाई सह संपूर्ण जिल्ह्यात समाधान व्यक्त होत असून सर्व स्तरातून डॉ. इंगोले यांचे अभिनंदन केले जात आहे.

डॉ.राजेश इंगोले हे गेल्या अनेक वर्षांपासून इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA) या राज्यस्तरीय संघटनेचे सक्रिय पदाधिकारी म्हणून कार्यरत आहेत.या माध्यमातून त्यांचा राज्यभर व्यापक संपर्क निर्माण झाला असून वैद्यकीय क्षेत्रासोबतच सामाजिक,शैक्षणिक, राजकीय,सांस्कृतिक, क्रीडा व धार्मिक उपक्रमांमध्ये त्यांचा सातत्यपूर्ण सहभाग राहिला आहे. समाजोपयोगी कार्याची हीच तळमळ त्यांच्या कार्याची ओळख ठरली आहे.या सामाजिक बांधिलकीतूनच सुमारे पाच वर्षांपूर्वी त्यांची अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेशी घनिष्ठ नाळ जुळली.मराठी पत्रकार परिषदेच्या अंबाजोगाई शाखेच्या वैद्यकीय कक्ष प्रमुख म्हणून कार्य करताना त्यांनी तालुक्यातील पत्रकारांच्या आरोग्याची विशेष काळजी घेतली. परिषदेमार्फत आयोजित करण्यात आलेल्या विविध आरोग्य तपासणी शिबिरांमध्ये डॉ.इंगोले



यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिली आहे. या शिबिरांच्या माध्यमा तून अनेक पत्रकारांच्या आजारांचे वेळीच निदान होऊन त्यांना योग्य उपचार व सातत्यपूर्ण मार्गदर्शन मिळाले. डॉ.इंगोले यांच्या कार्याचे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी वेळोवेळी कौतुक केले असून,त्यांनी राज्य पातळीवर अधिक व्यापक स्वरूपात कार्य करावे, असा आग्रह सातत्याने धरला होता.त्याच अनुषंगाने देवडी येथे पार पडलेल्या कार्यक्रमात त्यांच्या कार्याची दखल घेत वैद्यकीय कक्षाच्या राज्य उपाध्यक्षपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली. या प्रसंगी मुख्यमंत्री वैद्यकीय कक्षाचे प्रमुख मंगेशजी चिवटे,पद्मश्री पोपटराव पवार,मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख, अ.भा.म.प.अध्यक्ष मिलिंद अष्टीकर,मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे तसेच ज्येष्ठपत्रकार अमर हबीब यांच्या हस्ते डॉ.राजेश इंगोले यांना नियुक्तीपत्र प्रदान करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. डॉ.राजेश इंगोले यांच्या या निवडीमुळे मराठी पत्रकार परिषदेच्या वैद्यकीय कक्षाला राज्य पातळीवर नवी दिशा मिळणार असून, पत्रकारांच्या आरोग्य विषयक उपक्रमांना अधिक बळकटी मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.त्यांच्या नियुक्तीचे सर्व स्तरातून जोरदार स्वागत व अभिनंदन होत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077